RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ९४]　　गुरुवार, जुलै ६, २०२३/ आषाढ १५, शके १९४५　　[पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २६२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ जुलै, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.**

क्रमांक संकीर्ण-०६१९/ प्र.क्र.७५/१३स .— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) याच्या कलम १६५ च्या पोट-कलम (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग चार-ब, दिनांक १९ जुलै,२०२२ यामध्ये प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांकः संकीर्ण-०६१९/ प्र.क्र.७५/१३स, दिनांक २० जुलै, २०२२ अन्वये मागविलेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्यानंतर, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. महाराष्ट्र सहकारी संस्था ( दुसरी सुधारणा) नियम, २०२३, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ याच्या नियम, १०७-अ मध्ये,—

(एक) पोट-नियम (१) मधील, खंड (ब) मधील,—

(अ) पहिल्या परंतुकातील, "स्वतःची मोटार, मोटार सायकल, इत्यादी बाबत दावा करण्याचा अधिकार असेल" या शब्दा आणि चिन्हा ऐवजी "स्वतःची मोटार, मोटार सायकल, इत्यादी बाबत पन्नास टक्के दावा करण्याचा अधिकार असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) तिसऱ्या परंतुकातील, "२५ टक्के" या मजकुराऐवजी "शंभर टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) पोट-नियम (२) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

"**(२) दैनिक भत्ता व बैठक शुल्क.—** समितीचे सदस्य दौऱ्यावर असताना अनुज्ञेय असलेले दैनिक भत्त्याचे दर व बैठक शुल्क हे या नियमांच्या पोट-नियम (१) च्या खंड (ब) च्या तरतुदींना अधीन असतील आणि या सोबतच्या तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या वर्गाच्या समितीचा सदस्य उक्त तक्त्याच्या स्तंभ (२),(३),(४),(५),(६) किंवा यथास्थिति, (७) यामध्ये त्याच्यासमोर दर्शवलेल्या दराने दैनिक भत्ता मागण्यास हक्कदार असेल".

तक्ता

| समितीचे सदस्य ज्या वर्गाच्या संस्थेचे आहेत त्या संस्थेचा वर्ग | मुंबई व्यतिरिक्त अन्य क्षेत्रासाठी दैनिक भत्त्याचा सर्वसाधारण दर (रुपयांत) | दैनिक भत्त्याचा विशेष दर (रुपयांत) | | दिल्ली व इतर राज्यांसाठी (रुपयांत) | दैनिक भत्ता (रुपयांत) हॉटेलमधील वास्तव्यासाठी स्तंभ (३), (४) व (५) प्रमाणे असलेल्या क्षेत्रासाठी आकरण्यात येणारे प्रशुल्क | | बैठक शुल्काचा दर (रुपयांत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महानगरपालिका क्षेत्रासाठी | मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी | | स्तंभ (३) मधील क्षेत्र | स्तंभ (४) व (५) मधील क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१.** राज्य कार्यक्षेत्र असलेल्या किंवा रुपये १०० कोटी व त्यापेक्षा अधिक खेळते भांडवल असलेल्या सर्व सहकारी संस्था | ८०० | १२०० | १५०० | २००० | ४००० | ४००० | २००० |
| **२.** राज्य कार्यक्षेत्र असलेल्या किंवा रुपये ५० कोटी पेक्षा अधिक व रुपये १०० कोटी पेक्षा कमी खेळते भांडवल असलेल्या सर्व सहकारी संस्था. | ६०० | ९०० | १२०० | १५०० | ३००० | ३००० | १५०० |
| **३.** विभाग किंवा जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या किंवा खेळते भांडवल रुपये ५ कोटीपेक्षा अधिक परंतु ५० कोटींपेक्षा कमी असलेल्या सर्व सहकारी संस्था | ४०० | ५०० | १००० | १२०० | १००० | २००० | ८०० |
| **४.** तहसील/ तालुका कार्यक्षेत्र असलेल्या किंवा रुपये ५० लाख पेक्षा अधिक परंतु ५ कोटीपेक्षा कमी खेळते भांडवल असलेल्या सर्व सहकारी संस्था | ३०० | ५०० | १००० | १२०० | ६०० | २००० | ६०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **५.(अ)** रुपये ५० लाख किंवा त्याहुन अधिक खेळते भांडवल अशा व इतर सर्व संस्था | ३०० | ४०० | ९०० | १००० | ६०० | १००० | ३०० |
| **(ब)** अशा सर्व संस्था की, ज्यांचे अधिकृत भांडवल रुपये २५ लाख अगर त्याहून अधिक पण रुपये ५० लाखापेक्षा कमी असेल. | ३०० | ४०० | ९०० | १००० | ६०० | १००० | २०० |
| **(क)** इतर सर्व संस्था | ३०० | ४०० | ९०० | १००० | ६०० | १००० | १०० |

(१) हॉटेल वास्तव्यासाठी दैनिक भत्ता मागणीसाठी, लॉजिंग व बोर्डींग हाऊसमध्ये जो खर्च झाला असेल, तो खर्च दर्शविणाऱ्या मुळ पावत्या सादर करणे आवश्यक आहे.

(२) संस्था आपल्या समिती सदस्यांना दैनिक भत्ता, दैनिक भत्त्याचा जो विशेष दर तक्त्यातील स्तंभ (३) मधील परिच्छेद (i) मध्ये दर्शविला आहे. त्यानुसार समिती सदस्य दुसऱ्या राज्याच्या कोणत्याही राजधानीच्या किंवा इतर कोणत्याही शहरात जात असेल तर, त्या सदस्याला दौऱ्यासाठी स्तंभ (३) येथे नमूद केल्यानुसार विशेष दर देऊ शकेल.

(३) तक्त्यांच्या स्तंभ (१) मध्ये ज्या संस्थेच्या समितीचा सभासद आहे, त्या सभासदास स्तंभ (८) मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक बैठकीसाठी दर मिळण्यास तो पात्र राहिल. ही बैठकीची फी बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व विषयांची चर्चा झाली तरच मिळेल. जर, सभासद एकाच दिवशी एकापेक्षा जास्त बैठकीला हजर राहीला तर, त्या त्या दिवसाच्या कोणत्याही एकाच बैठकीच्या दराची त्याच्या पसंतीप्रमाणे मागणी करता येईल.

(४) तोट्यात चालणाऱ्या संस्था किंवा ना-नफा देणाऱ्या संस्थांच्या बाबतीत, निश्चित दैनंदिन भत्ता आणि बैठक भत्त्याचे दर वरील तक्त्यामधील संदर्भित भत्त्यांपैकी ५०% निश्चित केले जातील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Mantralaya (Annex), Madam Cama Marg, Hutatma Raguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 5th July, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT,1960.

No. Sankirna.0619/ C.R.75/13C.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of section 165 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (Mah. XXIV of 1961), and of all other powers enabling it that behalf, the Government of Maharashtra hereby, after considering objections and suggestions, pursuant to the Government Notification, Co-operation, Marketing and Textiles Department, No. Sankirna. 0619/ C.R.75/13C, dated the 19th July 2022 published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part IV-B, dated 20th July 2022, makes the following rules further to amend to the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Co-operative Societies (Second Amendment) Rules, 2023.

2. In rule 107A of the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961,—

(*i*) in sub-rule (*1*), in clause (*b*),-

(*a*) in the first proviso, for the words "own car, motor-cycle, etc., shall be entitled to claim" the words and signs "own car, motor-cycle, etc., shall be entitled to claim fifty per cent of." shall be substituted;

(*b*) in the third proviso, for the figure and words " 25 per cent." the words "100 per cent." shall be substituted;

(*ii*) for sub-rule (*2*), the following sub-rule shall be substituted, namely :—

***(2) Daily allowance and sitting fees.—*** Rates of daily allowance and sitting fees admissible while on tour shall be, subject to the provisions of clause (*b*), of sub-rule (1) of this rule, a member of a committee of a class of society shown in column (1) of the TABLE hereto shall be entitled to claim daily allowance at the rates shown against it in columns (2), (3), (4),(5),(6) or (7) as the case may be, of the said TABLE.

TABLE

| Class of society to which the member of committee belongs | Ordinary rate of daily allowance for area other than Mumbai ( in rupees) | Special rate of daily allowance (in rupees ) | | For Delhi and other States (in rupees) | Daily allowance (in rupees) For staying in hotels charging Tariffs, area as per Columns (3), (4) and (5) | | Rate of sitting fees (in rupees) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | For Corporation area | For Mumbai Corporation area | | Area in Column (3) | Area in Columns (4) and (5) | |
| **(1)** | **(2)** | **(3)** | **(4)** | **(5)** | **(6)** | **(7)** | **(8)** |
| **1.** All societies the area of operation of which extends to the whole of State of Maharashtra or working capital of which is rupees hundred crores or above. | 800 | 1200 | 1500 | 2000 | 4000 | 4000 | 2000 |
| **2.** All societies the area of operation of which extends to the whole of State of Maharashtra or working capital of which is rupees more than fifty crores and less than hundred crores. | 600 | 900 | 1200 | 1500 | 3000 | 3000 | 1500 |
| **3.** All societies the area of operation of which extends to a division or district or working capital of which is above rupees five crores but below rupees fifty crores. | 400 | 500 | 1000 | 1200 | 1000 | 2000 | 800 |
| **4.** All societies the area of operation of which extends to a Tahsil or working capital of which is above rupees fifty lakhs but below rupees five crores. | 300 | 500 | 1000 | 1200 | 600 | 2000 | 600 |
| **5.(i)** All other Societies with working capital of rupees fifty lakh or above | 300 | 400 | 900 | 1000 | 600 | 1000 | 300 |
| **(ii)** All other societies the authorized | 300 | 400 | 900 | 1000 | 600 | 1000 | 200 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| capital of which is rupees twenty five lakhs but less than rupees fifty lakhs | | | | | | | |
| (iii) All other Societies | 300 | 400 | 900 | 1000 | 600 | 1000 | 100 |

*Note.*— (1) For claiming Daily Allowance for staying in hotels receipts indicating the actual expenditure incurred on lodging and boarding should be produced.

(2) A society may allow a member of the committee daily allowance at a special rate mentioned in column (3) of the Table in paragraph (i) for tour a city or town in other State other than the capitals of such State, in the opinion of its committee is a big city or town like those mentioned in that column.

(3) A member of a committee of society shown in column (1) of the TABLE hereto shall be entitled to claim per meeting sitting fee at the rate shown, against it in column (8) of the said TABLE. Such fee shall be payable only after all the subjects on the agenda of the meeting are discussed. If the member has attended more than one meetings on the same day, he shall be entitled to claim sitting fee for any one of the meeting at the choice of such member.

(4) In the case of loss-making organizations or non-profitable organizations, the rates of fixed daily allowance and meeting allowance fixed shall be 50% of the allowances referred in the above TABLE in the respective categories.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH KUMAR,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.